# "बाबा"

आशीर्वादाचा प्रेमळ हात बाबांचा असतो सदैव पाठी
अंगणातील आधारवडच जणू आहेत, छायेत असणाऱ्यांसाठी ---
संकट कुठलेही येवू दे, करीती धडाडीने सामना
खचून जावू नये म्हणूनी, देती धीर या मना ---
कधी प्रेमाने, कधी रागाने, सांगती समजावूनी
घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा, अर्थ न उरतो, त्यांच्यावाचूनी ---
दुःखाचे काटे टोचू नये म्हणून पसरविती हिरवळ
त्या मखमली वाटेवर असतो स्नेहसुमनांचा दरवळ ---
रात्रंदिवस कष्ट सोसूनी, राखली घरकुल अबाधीत
सर्वांच्या संगतीत ते शोधत असणार स्वर्ग कदाचित ---
इवल्या इवल्या चिमण्या पिल्लांना वाढविले आजवरी
शिक्षा, संस्कार देवूनी घडविले, शिल्पकारच ते खरोखरी ---
आईची असते साथ समरसूनी, जशी दुधात साखर
धडपड त्यांची सतत असते, घालण्यास मायेची पाखर ---
दुःखावेग होताच असह्य, आईच्या कुशीत सापडे आधार
जीवनातील रंगमंचावर पण बाबाच असतात खरे सुत्रधार ---
मातृपितृऋण ते फेडावे कसे कळेना, देवासोबत त्यांनाही वंदूया
इच्छा त्यांच्या पूर्ण करूनी, जबाबदार बनूनी समाधान त्यांना देवूया ---

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी



श्री. प्रकाश देशपांडे